# महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

अर्ज क्रमांक ०१/२०१६

1241

जा.क्र.जिउनि/सावकारी/कलम१८/बाआमु/चारनेर/ /२०१६
औरंगाबाद दिनांक ०४/०३/२०१६

वाचा :-

१. श्री. बाळु अंबादास मुठ्ठे रा. चारनेरवाडी ता.सिल्लोड जि. औरंगाबाद यांचा तक्रार अर्ज दि.११/११/२०१४
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिउनि/सावकारीतक्रार/३५३४/२०१४ दिनांक १४/११/२०१४
३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांचा अहवाल दिनांक ३१/१२/२०१५
४. श्री. डि.डि.जैस्वाल चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल दिनांक २८/१२/२०१५
५. श्री. बाळु अंबादास मुठ्ठे रा. चारनेरवाडी ता.सिल्लोड जि. औरंगाबाद यांचा रू.१०० च्या प्रतिज्ञापत्रावरील अर्ज दिनांक ०७/०१/२०१६
६. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८.कारणे दाखवा नोटीस जा.क्र. जिउनि/सावकारी/ क.१८/२८८/२०१६ दिनांक १९/०१/२०१६

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

श्री. बाळु आंबादास मुठ्ठे
रा. चारनेर वाडी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद — अर्जदार

**विरूध्द**

१. श्री. भिका छोटीराम चुंगडे
रा. चारनेर वाडी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद. — गैरअर्जदार
२. श्री. सुपडू वाळुबा साळवे.
रा. चारनेर वाडी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद.

*ज्याअर्थी वाचा क्रमांक १ अन्वये* अर्जदार श्री. बाळु आंबादास मुठ्ठे या पुढे ज्यांचा उल्लेख अर्जदार असा केलेला आहे. यांनी गैरअर्जदार १ श्री. भिका छोटीराम चुंगडे या पुढे ज्यांचा उल्लेख गैरअर्जदार १ असा केलेला आहे यांचे विरूध्द अवैध सावकारी संबंधाने तक्रार दिल्याने सदर तक्रारीची चौकशी करण्यासाठी वाचा क्रमांक २ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांना चौकशी करीता कळविण्यात आलेले होते त्यानुसार त्यांनी त्यांच्या कार्यालयातील श्री. डि.डि.जैस्वाल, सहकार अधिकारी श्रेणी-१ यांच्या मार्फत चौकशी केलेली असून श्री. जैस्वाल यांनी त्यांचा चौकशी अहवाल वाचा क्रमांक ४ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांच्याकडे सादर केलेला आहे व वाचा क्रमांक ३ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांनी त्यांचे अभिप्रायासह सदरचा चौकशी अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ५ अन्वये अर्जदार यांनी रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर सावकारीच्या ओघात खरेदीखत करून दिलेली शेतजमिन परत मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जासोबत श्री. डी.डी.जैस्वाल सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचा दिनांक २८/१२/२०१५ चा चौकशी अहवाल व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,

ता. सिल्लोड यांचा अहवाल दिनांक ३१/१२/२०१५ तसेच त्यासोबत चौकशीच्या वेळी झालेले जाब जवाब व पुरावे इ. कागदपत्रे सादर केलेले आहे.

सदर विनंती अर्जाद्वारे अर्जदार यांनी अशी विनंती केली आहे की, ते चारनेरवाडी येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीतआहे. त्यांनी व त्यांचे वडील दोघांनी मिळुन चारनेरवाडी येथील खाजगी सावकार गैर अर्जदार क्रमांक १. यांच्याकडुन बहिनिच्या लग्नासाठी रू. ५००००/- सन २००५ मध्ये ५% व्याजदराने रक्कम व्याजाने घेतली होती त्या पैशास धर म्हणुन त्यांचे नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन सदर सावकार यांचा हस्तक गैर अर्जदार क्रमांक २. श्री. सुपडु वाळुबा साळवे यापुढे ज्यांचा उल्लेख गैरअर्जदार २ असा केलेला आहे. यांच्या नावाने गैर अर्जदार क्रमांक १. यांच्या सांगितल्यानुसार मुद्दल व व्याजाची परतफेड झाल्यावर जमिन वापस देण्याच्या तोंडी बोली ठेवुन खरेदीखता द्वारे लिहुन दिलेली होती. पैशास व्याज असल्याने सदरची जमिन त्यांच्या ताब्यात असून त्या जमिनीवर ते पिक घेत आहेत. या व्यवहारात गावातील पंच नामे श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, श्री.कैलास कोंडुसिंग बिलवाल, श्री.नारायण बजरंग गोठवाल, श्री.देवसिंग फुलसिंग महेर, श्री.विठ्ठल तुळशिराम गोठवाल हे साक्षीदार होते आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार १ सावकारास सन २०१५ पर्यंत रू. १०८०००/- मुद्दल व व्याज परत करूनही गैरअर्जदार १ सावकार जमिन परत पलटवुन देण्याची तोंडी बोली असुनही त्यांनी जमिन परत पलटवुन न दिल्याने त्यांनी त्यांच्या विरोधात अवैध सावकारी बाबत तक्रार केलेली आहे. या तक्रारीची चौकशी सहाय्यक निबंधक कार्यालया मार्फत झालेली असल्याने व त्यांनी हि जमिन सावकारीच्या ओघात लिहुन दिलेली असल्याने सदरचे खरेदीखत अवैध घोषीत करून शेतजमिनीचा मालकी हक्क परत मिळवुन दयावा अशी विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ५ अन्वये अर्जदार यांनी रू. १०० च्या शपथपत्राद्वारे सावकारीच्या ओघात लिहुन दिलेली चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन परत मिळणे बाबत अर्ज सादर केलेला आहे.

त्या अर्जास अनुसरून या कार्यालयाने वाचा क्रमांक ६ नुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये सुनावणी नोटीस निर्गमित करून दिनांक २८/०१/२०१५ रोजी सुनावणी ठेवलेली होती. सदर सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.सिल्लोड यांच्या मार्फत त्यांचे प्राधिकृत अधिकारी श्री. दिलीप दे. जैस्वाल सहकार अधिकारी श्रेणी-१ हे हजर होते. तसेच गैरअर्जदार यांच्या वतीने ॲड एस.बी.गोठवाल यांनी वकील पत्र दाखल करून लेखी म्हणने मांडण्यासाठी वेळ देण्याबाबत विनंती केली व अर्जदाराचे शपथपत्र, अर्ज, चौकशी अहवाल, अर्जदार यांचे म्हणने इ. कागदपत्रे देण्या बाबत विनंती केली त्यानुसार सदरील कागदपत्रे त्यांना देण्यात आले. अर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणने दिनांक १६/०२/२०१६ चे सुनावणीच्या वेळी सादर केले.

अर्जदार यांनी त्यांच्या लेखी म्हणण्यात असे नमुद केले की, त्यांनी दिनांक ११.११.२०१४ रोजी व वेळोवेळी सहकार खात्याकडे खाजगी सावकार गैरअर्जदार १व त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या विरुध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असुन त्या तक्रारी खऱ्या आहेत ,त्यांना त्यांची बहीण नामे सुनिताबाई हिच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांचे वडील व त्यांनी दोघांनी मिळुन चारनेरवाडी येथील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन रु.५०,०००/- दरमहा दरशेकडा रु.५ टक्के व्याजदराने सन २००५ मध्ये घेतलेले होते.या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली चारनेरवाडी शिवारातील गट २८ मधील ८१ आर शेत जमीन सदर सावकार यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावाने सावकाराच्या सांगण्यावरुन मुद्दल व व्याजाची परतफेड झाल्यावर जमीन वापस देण्याची तोंडी बोली पंचसाक्षीदारा समक्ष ठेवुन कायम खरेदी खताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याने जमिन त्यांचे ताब्यात आहे व त्या शेत जमिनीवर चालु वर्षी कापुस पिक घेतलेले आहे.आतापर्यंत त्यांनी सदर सावकारास मुद्दल व व्याज मिळुन सन २००५ ते २०१५ या कालावधीत रु.१०८०००/- परत केलेले आहे.व या शेतजमिनिचे खरेदीखत सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या घरी ठेवलेले आहे. सावकार आणखी ९,०००००/- रुपयाची मागणी करीत आहे. ती रक्कम न दिल्यास जमीन परस्पर विक्री करण्याची धमकी व त्यांच्या हस्तकाकडुन अट्रोसिटी दाखल करण्याची धमकी देत आहे. सावकार व त्यांच्यामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे. व त्या बदल्यात जमिन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेत जमिन त्यांच्या हस्तकाच्या नावावर लिहुन दिलेली आहे. या सावकारी व्यवहारात गावातील ०५ पंच श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, श्री कैलास कोंडुसिंग बिलवाल, श्री नारायण बजरंग गोठवाल, श्री देवसिंग फुलसिंग महेर, श्री विठ्ठलसिंग तुलसिराम गोठवाल व तंटामुक्ती अध्यक्ष श्री आबेद सरदार देशमुख हे साक्षिदार आहेत.

त्यांच्या तक्रारीस अनुसरुन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.सिल्लोड यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यालयातील सहकार अधिकारी श्रेणी १ यांनी याप्रकरणी चौकशी केली असुन त्यांनी त्याचा अहवाल दिनांक २८.१२.२०१५ रोजी सादर केलेला आहे. चौकशीअंती सदर अहवालातील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

अर्जदार यांनी त्यांची चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन ही अवैध खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडे अर्जादारांचे बहिणीच्या लग्नासाठी ५% व्याजदराने रू. ५००००/- या रकमेसाठी अवैध सावकारीच्या ओघात गैरअर्जदार १यांच्या सांगीतल्या वरून गैरअर्जदार २ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली आहे व ति शेतजमिन अर्जदार यांच्या ताब्यात खरेदीखताच्या दिनांका पासुन ते आजपर्यंत आहे. व या अवैध सावकारी व्यवहारात गैरअर्जदार १ व त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांचे संगनमत आहे.

चौकशीचे वेळी सदर व्यवहारातील साक्षिदार यांनी त्यांचे जवाब चौकशी अधिकारी यांचे समक्ष नोंदविलेले आहे.त्या साक्षिदाराच्या जवाबाची माहिती त्यांनी लेखी म्हणण्यात नमुद केली. ती माहिती पुढील प्रमाणे आहे.

श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल रा. चारनेरवाडी यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर शपथेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असून त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार, गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखतात अर्जदार यांचे वडीलांना त्यांचे मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा नामे बाळु अंबादास मुठ्ठे दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्या कडुन सन २००५ मध्ये रू. ५००००/- दमादशे ५% या व्याज दराने रक्कम घेतली होती. या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन सावकाराच्या सांगण्यावरून सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यवर जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर पंचासमक्ष खरेदीखता आधाराने लिहुन दिलेली होती. या खरेदीखतावर त्यांनी साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे. अर्जदार व गैरअर्जदार १यांच्यात जमिन खरेदीचा व्यवहार नसुन खाजगी सावकारीचा व्यवहार आहे. पैशास व्याज असल्याने शेतजमिन अर्जदार यांच्या ताब्यात असून त्या जमिनीवर ते पिक घेत आहे. सध्यास्थितीत त्या जमिनीमध्ये कापूस या पिकाची लागवड केलेली आहे. व काही जमिन पडीक आहे. अर्जदार याच्या सदर शेतजमिनीच्या शेजारीच त्याची शेतजमिन आहे. आतापर्यंत अर्जदार यांनी सदर सावकारास रू.१०८०००/- मुद्दल व व्याजासहीत त्यांच्या समक्ष परत केलेले आहे. असे असतांना गैरअर्जदार १ सावकार त्यांची शेतजमिन परत पलटवुन देण्याची तोंडी बोली असल्यावरही जमिन परत पलटवुन देत नाही. सावकार आणखी रू. ९०००००/- ची मागणी करीत आहे. व जमिन परस्पर विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ यांच्या मार्फत त्याच्यावर खोटी अॅट्रॉसिटीची केस करण्याची धमकी देत आहे. असा जवाब चौकशी अधिकारी यांचे कडे सादर केलेला आहे.

या व्यवहारतील दुसरे साक्षीदार श्री. कैलास कोंडुसिंग बिलवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्यानावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे. अर्जदार यांनी आतापर्यत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. सावकार आणखी

रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तकामार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

या व्यवहारतील तिसरे साक्षीदार श्री नारायण बजरंग गोठवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपथेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच पुर्वेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तकामार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केला आहे.

या व्यवहारतील चौथे साक्षीदार श्री जनार्धन चंद्रभान होळकर यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन , आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच दक्षिणेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन

विकण्याची व हस्तकामार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

या व्यवहारतील पाचवे साक्षीदार श्री देवसिंग फुलसिंग महेर यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपथेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच उत्तरेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यत सदर सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तकामार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील सहावे साक्षीदार श्री विठ्ठलसिंग तुळशीराम गोठवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५०,०००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये चालु वर्षी कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच उत्तरेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यत सदर सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१,०८,०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९,००,०००/-ची मागणी करित

आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तकामार्फत खोटी अॅट्रॉसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

तसेच तलाठी यांनी दिनांक १५.१२.२०१४ रोजी केलेल्या पंचनाम्यात असे नमुद आहे की, गट नं.२८ मध्ये पंचासमक्ष गट नं.२८ मध्ये पाहणी केली असता अर्जदार यांनी सन २०१४-१५ या खरीप हंगामात गतवर्षी मका पीक घेतलेले आहे .व पीक सोगुंन पुंज जमा केलेला आहे. संबंधीत क्षेत्र ट्रॅक्टरने कल्टीवेटर केलेले आहे.पंचाच्या सांगण्यानुसार गैरअर्जदार २ यांचे नाव जरी ७/१२ च्या मालकी हक्कात नोंद असली तरी संबंधीत ८१ आर जमीन मध्ये अर्जदार हे पीक घेतात व उपस्थित पंच लोक यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर हजर राहुन त्यांच्या सदसदविवेक बुध्दीने पंचनामा करुन दिला असल्याबाबत पंचनाम्यात नमुद आहे.या पंचनाम्यावर तलाठी व पंचलोक श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल,श्री अनिल बाबुराव अंभोरे,श्री सुखदेव लक्ष्मण काळे,श्री देवसिंग फुलसिंग महेर,श्री तुकाराम अश्रुबा होळकर,श्री अंचितराव देवराव मुठ्ठे,श्री असेफमिया युसुफमिया देशमुख व श्री नय्युम मोहम्मद पटेल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

त्याचप्रमाणे श्री संजय प्रतापसिंग गोठवाल रा.चारनेरवाडी,यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ११.१२.२०१५ रोजी शपथेवर जवाब चौकशी अधिकारी यांचे समोर सादर केलेला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते चारनेरवाडी येथील राहीवासी असुन व्यवसायाने शेती करतात. त्यांनी गावातील सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन रु.३०,०००/- द.म.द.शे ३%व्याज दाराने घेतले होते व या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची गट नं.२० मधील ४१ आर शेतजमीन सावकार गैरअर्जदार १ यांच्या सांगण्यावरुन सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्यानावाने दिनांक २६/०२/२००४ रोजी खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली होती.सदरचा व्यवहार हा पुर्णपणे सावकारी व्यवहार असल्याने जमीन त्यांच्या ताब्यात होती.तद्नंतर या घेतलेल्या रक्कमेपोटी त्यांनी व्याजासह रु.६०,०००/- सावकार गैरअर्जदार १ यांना परत केलेले आहे. ही जमीन त्यांनी त्यांचा पुतण्या श्री नारायण बजरंग गोठवाल यांना विक्री केल्याने त्यांचे सांगितल्याप्रमाणे सावकार गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांना सांगुन त्यांया पुतण्याच्या नावाने शेतजमिन दिनांक २९/०३/२००५ रोजी खरेदीखता द्वारे परत पलटुन दिलेली आहे. त्यांनी ही शेत जमिन सावकारी व्यवहारात गैरअर्जदार १ यांनी सांगितल्यानुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने लिहुन दिलेली होती.

उपरोक्त प्रमाणे म्हणने मांडुण अर्जदारांनी विनंती केली की,गैरअर्जदार १ यांचा अवैध सावकारी व्यवसाय असुन यामध्ये ते त्यांचा हस्तक म्हणुन गैरअर्जदार २ यांचा वापर करुन घेत आहेत.अर्जदार यांची शेतजमीन अवैध सावकारी व्यवहारात लिहुन दिल्याबाबत चौकशी अहवालात सिध्द झालेले आहे. तसेच व्यवहारातील साक्षीदार हे अर्जदार यांची जमीन सावकारी व्यवहारात लिहुन दिलेली आहे, असे जवाबात नमुद करीत आहेत. त्यामुळे त्यांचा अर्ज मान्य करण्यात येऊन चारनेरवाडी शिवारातील गट नं२८ मधील ८१ आर शेत जमीन ही खरेदी खत

क्र.१६००/२००५ दिनांक २९.०३.२००५ नुसार अवैध सावकारी संबंधाने त्यांनी लिहुन दिलेली असल्याने या शेत जमिनीचे खरेदी खत हे अवैध सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेले असल्याने ते अवैध असल्याचे घोषित करुन सदर खरेदीखत रद्द करुन सदरची शेत जमीन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये हस्तांतरणकार अर्जदार मुळ मालक यांच्या नावे परत करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी उक्त प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक १६/०२/२०१६ रोजी घेण्यात आली सदर सुनावणीस अर्जदार, गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांच्या वतीने ॲड गोठवाल व अडॅ अनिल मेहेर हजर होऊन लेखी म्हणने व शपथपत्र दाखल केले त्याची प्रत अर्जदार यांना देण्यात आली. सुनावणीच्या वेळी सावकारी चौकशीच्या संबंधाने श्री. संजय प्रताप गोठवाल सुनावणीस उपस्थित झाले व म्हणने मांडले की, अर्जदार श्री. बाळु यांचे भाऊ रघुनाथ अंबादास यांनी को-याबाँडवर सही घेऊन त्यांचा दुरूपयोग करून खोटे शपथपत्र फसवणुक करून तयार करून घेतले आहे. वास्तविक त्यांनी दिनांक २६/०४/२००४ रोजी सुपडु वाळुबा साळवे यांना त्यांचे मालकीची ४२ आर जमिन कायम खरेदीखताने रू. ३८०००/- विक्री केली त्यांनी ती जमिन दिनांक २९/०३/२००५ रोजी त्यांचे भावाचा मुलगा श्री. नारायण बजरंग गोठवाल रू. ४४०००/- विक्री केली. त्या जमिनीचा ताबा त्यांच्या भावाच्या मुलाकडे आहे. या व्यवहारात सावकारी व्यवहार झालेला नाही. या व्यतिरिक्त त्यांनी श्री. सुदाम अंबरसिंग गोठवाल यांना २ एकर जमिन रू. ११००००/- विक्री केली आहे. प्रस्तुत वादातील अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात सावकारी झालेली नाही. सदरचा व्यवहार खरेदी विक्रीचा आहे. सदरचे खरेदीखत त्यांचे समोर झालेले आहे. व पैसे त्यांच्या समोर दिलेले आहे. त्यांच्या भावाने रू.४४०००/- दिले व त्यांच्याकडील काही पैसे टाकुन रू.६६०००/- दिले सदरच्या शेतजमिनीचा ताबा गैरअर्जदार २ यांचा असून त्यामध्ये कुडाचे घर आहे. सदर शेतावर जि.म.स.बँकेचे रू. १२०००/- कर्ज घेतलेले आहे. या दोन्ही व्यवहारामध्ये खरेदीखतावर ते साक्षीदार नाहीत. परंतु खरेदीखत झाले त्या वेळी ते हजर होते. व्यवहार गावात झाला असून पैसे सिल्लोड येथे देण्यात आलेले आहे.

या नंतर गैरअर्जदार क्रमांक २ यांनी शपथेवर सांगितले की ते ४ पतराच्या कुडाच्या घरात राहतात सन २००५ मध्ये त्यांनी २ एकर १ आर जमिन अर्जदार यांच्याकडुन रू. ६६०००/- घेतली जमिन पडीत पडली होती तेव्हा बाजरी पेरलेली होती. त्यांच्याकडे बैलजोडी नाही. गैरअर्जदार १ यांच्याकडुन बैल आनले होते म्हणुन त्यांचे नाव तक्रारीत टाकले आहे. शेती करण्यासाठी अर्जदार आडवे येतात या उलट काहीही म्हणायचे नाही असे नमुद केले.

अर्जदार यांनी त्यांचे या पुर्वी दिलेले लेखी म्हणने ग्राहय धरण्यात यावे असे दिनांक १६/०२/२०१६ सुनावणीच्या दरम्यान सांगितले.

गैरअर्जदार क्रमांक १ यांच्या वतिने ॲड एस.बी.गोठवाल व गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या वतीने ॲड अनिल के. मेहेर यांनी लेखी म्हणने व शपथपत्र दाखल केले व त्या प्रमाणे लेखी युक्तीवाद ग्राहय धरावा अशी विनंती केल्याने सदर प्रकरण निर्णयास्तव बंद करण्यात आले.

गैरअर्जदार क्रमांक १ यांच्या वतिने ॲड एस.बी.गोठवाल यांनी रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर शपथेवर म्हणने सादर केले त्यामध्ये त्यांनी नमुद केले की, गैरअर्जदार क्रमांक २ यांनी दिनांक २६/०२/२००४ रोजी श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांच्याकडुन त्यांच्या मालकी व ताब्यातील मिळकत चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २० मधील ४२ आर शेतजमिन नोंदणीकृत खरेदीखत क्रमांक ९१५/२००४ द्वारे कायमस्वरूपी विकत घेतलेली होती. ही मिळकत गैर अर्जदार क्रमांक २ यांनी स्वकष्टातुन रू. ३८०००/- मध्ये कायमस्वरूपी विकत घेतलेली होती व ही मिळकत विकत घेतल्यावर गैरअर्जदार क्रमांक २ यांनी शेतीचा व्यवसाय करून व मोलमजुरी करीत होते. या जमिनीमधुन हाकलुन लावण्यासाठी श्री.संजय प्रतापसिंग गोठवाल व त्यांचे भाऊ श्री.बजरंगसिंग गोठवाल यांची मुले त्रास देऊ लागल्याने त्या त्रासाला कंटाळुन गैरअर्जदार क्रमांक २ यांनी सदरची शेतजमिन रू. ४४०००/- मध्ये बजरंगसिंग गोठवाल यांचा मुलगा नारायनसिंग गोठवाल यांना विक्री केलेली आहे. अर्जदार यांना ही जमिन विक्री केल्यानंतर त्यांना कोणतीही जमिन शिल्लक राहत नसल्याने त्यांचे गावातील श्री. बाळु आंबादास मुठ्ठे यांना आर्थिक व कौंटुंबिक गरजेच्या पुर्ततेसाठी मौजे चारनेरवाडी येथील गट नंबर २८ मधील ८१ आर जमिन विक्री करावयाची होती. व ति गैरअर्जदार यांना पसंत होती व पुरविचे गट नंबर २० मधील येणारे पैसे लक्षात ठेवुन गैरअर्जदार क्रमांक २ यांनी अर्जदार यांची जमिन विकत घेण्यास संम्मती दर्शविली व दोघात खरेदीचा व्यवहार रू. ६६०००/- मध्ये ठरला होता. व गट नंबर २० मधील जमिन ही त्याच दिवशी विक्री करण्याचे ठरले होते. व ठरल्याप्रमाणे दिनांक २९/०३/२००५ गट नंबर २० मधील ४१ आर शेतजमिन हि श्री. नारायण गोठवाल यांना रू. ४४०००/- मध्ये विक्री केल्या नंतर त्याच दिवशी गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन अर्जदार यांच्याकडून रू. ६६०००/- मध्ये खरेदी केली या मध्ये रू. २२०००/- मोल मजुरी करून कमविलेले टाकण्यात आले व या जमिनीचे खरेदीखत दुय्यम निबंधक यांच्या समोर करण्यात आले. सदरचा व्यवहार हा खरेदीविक्रीचा असून या मध्ये कोणताही सावकारी व्यवहार नाही. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेले कथन खोटे असून त्यांच्या सोबत दुशमनी पोटी खोटी केसेस दाखल करून अर्जदार हे त्रास देत आहे. सदरील अर्जदार यांचेवर गैरअर्जदार क्रमांक २ यांनी फौजदारी केसेस दाखल केलेल्या असून त्यांचे विरूध्द सिल्लोड पोलीस स्टेशन यांच्याकडे ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल केलेला आहे व हे प्रकरण न्यायालयात चालु आहे. सदरील खोटे सावकारी प्रकरण हेतुपुरस्कर रित्या गैरअर्जदार क्रमांक २ यांची जमिन हडप करण्याच्या उद्देशाने दाखल केलेल्या आहे. या प्रकरणात अर्जदार यांच्याकडून त्यांच्या गावातील व्यक्ती नामे श्री.उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, श्री.कैलास कोंडुसिंग बिलवाल, श्री.नारायण बजरंग गोठवाल, श्री.जनार्धन चंद्रभान होळकर, श्री.देवसिंग फुलसिंग महेर, श्री.विठ्ठलसिंग तुळशिराम गोठवाल यांनी दाखल केलेले शपथपत्र हे संपुर्ण पणे खोटे व बनावट आहे. व त्यातील संपुर्ण मजकुर हा खोटा आहे. त्यांच्या विरूध्द आजपर्यंत गावातील अथवा इतर व्यक्तिने सावकारी बाबत तक्रार केलेली नाही. त्यांनी कोणताही सावकारीचा व्यवहार केलेला नाही व करत नाही.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
DIST AURANGABAD

त्यांच्या गावातील गैर अर्जदार क्रमांक २ यांच्याशी कोणताही संबंध नाही व ते त्यांच्याकडे कोणताही प्रकारे सालगडी अथवा महिण्याने किंवा हस्तक म्हणुन काम करीत नाही. दोघात कोणत्याही प्रकारे मैत्रीचे अथवा नात्याचे संबंध नाही. अर्जदार यांच्याकडुन दाखल करण्यात आलेले सर्व लोकांचे शपथपत्र खोटे व बनावट आहे. चौकशी अधिकारी श्री. डी.डी.जैस्वाल यांच्या अहवालात उल्लेख केल्या प्रमाणे दिनांक १५/१२/२०१४ रोजी गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या मालकीच्या गट नंबर २८ मध्ये कोणत्याही प्रकारचा पंचनामा केलेला नव्हाता दिनांक १५/१२/२०१४ रोजी गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या जमिनीत येऊन तलाठी यांनी केलेला पंचनामा सत्यपरिस्थीतीशी विसंगत आहे. व हि जमिन त्यांच्या ताब्यात असून तेथे झोपडी असून त्यांचे कुटुंब त्या झोपडीत राहत आहे. अर्जदार यांनी त्यांच्या गावातील श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांची फसवसुन करून खोटे शपथपत्र त्यांच्या बाजुने करून घेतलेले आहे हे सुनावणीच्या वेळी श्री.संजय गोठवाल यांनी कबुल केलेले आहे व सदर जमिन खरेदीविक्री अंतर्गत असल्याचे जबाबात लिहुन दिलेले आहे. त्याच्या बाजुने गावातील रहिवाशी नामे श्री.विजयसिंग चैनसिंग गोठवाल, श्री. सुरजसिंग [illegible] महेर, श्री.गणेश लखीचंद गोठवाल, श्री.निमचंद हरचंद भोपळे, श्री.सुखलाल फकिरचंद गोठवाल व श्री.संग्राम देवसिंग चुंगडे यांचे मुळ शपथपत्र त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घेतलेले असून त्या मध्ये त्यांनी गट नंबर २८ मधील जमिनीबाबत सत्यपरिस्थीती संबंधाने माहिती सांगितलेली आहे. व झालेला व्यवहार हा निव्वळ खरेदीविक्रीचा आहे. यात कोणताही सावकारी व्यवहार नसुन ही जमिन त्यांच्या ताब्यात आहे व ते त्यावर पिक घेत आहे. गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या जमिनीशी कोणाचाही संबंध नाही. सावकारी प्रकरणात गुंतविण्यासाठी सदरिल प्रकरण दाखल केलेले आहे. या खोटया नाटया केसेस यास कंटाळुन मा. दिवाणी न्यायालय सिल्लोड येथे अर्जदार यांनी त्यांच्या जमिनीत हस्तक्षेप करू नये म्हणुन दिवाणी दावा क्रमांक २३६/२०१५ दाखल केलेला आहे. त्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय यांनी अर्जदार यांना नोटीसा काढलेल्या आहे. व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी योग्य तो तपास करून गैरअर्जदार यांच्यावर अन्याय होऊ नये यासाठी हे खोटे सावकारी प्रकरण फेटाळावे अशी विनंती केली.

गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या वतीने ॲड अनिल के मेहेर यांनी लेखी म्हणने रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर सादर केले असून त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, गैरअर्जदार क्रमांक २ यांनी दिनांक २६/०२/२००४ रोजी संजय प्रतापसिंग गोठवाल यांच्याकडुन त्यांच्या मालकी व ताब्यातील मिळकत चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ४२ आर शेतजमिन नोंदणीकृत खरेदीखत क्रमांक ९१५/२००४ द्वारे कायमस्वरूपी विकत घेतलेली होती . ही मिळकत गैर अर्जदार क्रमांक २ यांनी स्वकष्टातुन रू. ३८०००/- मध्ये कायमस्वरूपी विकत घेतलेली होती व ही मिळकत विकत घेतल्यावर गैरअर्जदार क्रमांक २ यांनी शेतीचा व्यवसाय करून व मोलमजुरी करीत होते. या जमिनी मधुन हकलुन लावण्यासाठी श्री.संजय प्रतापसिंग गोठवाल व त्यांचे भाऊ श्री.बजरंगसिंग गोठवाल यांची मुले त्रास देऊ लागल्याने त्या त्रासाला कंटाळुन गैरअर्जदार क्रमांक २ यांनी सदरची शेतजमिन रू. ४४०००/- मध्ये श्री.बजरंगसिंग गोठवाल यांचा मुलगा श्री.नारायसिंग गोठवाल यांना विक्री केलेली आहे. अर्जदार यांना हि जमिन

विक्री केल्यानंतर त्यांना कोणतीही जमिन शिल्लक राहत नसल्याने त्यांचे गावातील अर्जदार यांना आर्थिक व कौटुंबिक गरजेच्या पुर्ततेसाठी मौजे चारनेरवाडी येथील गट नंबर २८ मधील ८१ आर जमिन विक्री करावयाची होती. व ति गैरअर्जदार यांना पसंत होती व पुरविचे गट नंबर २० मधील येणारे पैसे लक्षात ठेवुन गैरअर्जदार क्रमांक २ यांनी बाळु मुठ्ठे यांची जमिन विकत घेण्यास संम्मती दर्शविली व दोघात खरेदीचा व्यवहार रू. ६६०००/- मध्ये ठरला होता. व गट नंबर २० मधील जमिन ही त्याच दिवशी विक्री करण्याचे ठरले होते. व ठरल्याप्रमाणे दिनांक २९/०३/२००५ मधील ४१ आर शेतजमिन ही श्री.नारायण गोठवाल यांना रू. ४४०००/- मध्ये विक्री केल्या नंतर त्याच दिवशी गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन अर्जदार यांच्याकडून रू. ६६०००/- मध्ये खरेदी केली या मध्ये रू. २२०००/- मोल मजुरी करून कमविलेले टाकण्यात आले व या जमिनीचे खरेदीखत दुय्यम निबंधक यांच्या समोर करण्यात आले. सदरचा व्यवहार हा खरेदीविक्रीचा असून या मध्ये कोणताही सावकारी व्यवहार नाही. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेले कथन खोटे असून त्यांच्या सोबत दुशमनी पोटी खोटी केसेस दाखल करून अर्जदार हे त्रास देत आहे. सदरील अर्जदार यांचेवर गैरअर्जदार क्रमांक २ यांनी फौजदारी केसेस दाखल केलेल्या असून त्यांचे विरूध्द सिल्लोड पोलीस स्टेशन यांच्याकडे ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल केलेला आहे व हे प्रकरण न्यायालयात चालु आहे. सदरील खोटे सावकारी प्रकरण हेतुपुरस्कर रित्या गैरअर्जदार क्रमांक २ यांची जमिन हडप करण्याच्या उद्देशाने दाखल केलेल्या आहे. या प्रकरणात अर्जदार यांच्याकडून त्यांच्या गावातील व्यक्ती नामे श्री.उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, श्री.कैलास कोंडुसिंग बिलवाल, श्री.नारायण बजरंग गोठवाल, श्री.जनार्धन चंद्रभान होळकर, श्री.देवसिंग फुलसिंग मेहर, श्री.विठ्ठलसिंग तुळशिराम गोठवाल यांनी दाखल केलेले शपथपत्र हे संपुर्ण पणे खोटे व बनावट आहे. व त्यातील संपुर्ण मजकुर हा खोटा आहे. त्यांच्या विरूध्द आजपर्यंत गावातील अथवा इतर व्यक्तिने सावकारी बाबत तक्रार केलेली नाही. त्यांनी कोणताही सावकारीचा व्यवहार केलेला नाही व करत नाही.

तसेच गावातील गैर अर्जदार क्रमांक १ यांच्याशी त्यांचा कोणताही संबंधनाही व ते त्यांच्याकडे कोणताही प्रकारे सालगडी अथवा महिण्याने किंवा हस्तक म्हणुन काम करीत नाही. दोघात कोणत्याही प्रकारे मैत्रीचे अथवा नात्याचे संबंध नाही. अर्जदार यांच्याकडुन दाखल करण्यात आलेले सर्व लोकांचे शपथपत्र खोटे व बनावट आहे. चौकशी अधिकारी श्री. डी.डी.जैस्वाल यांच्या अहवालात उल्लेख केल्या प्रमाणे दिनांक १५/१२/२०१४ रोजी गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या मालकीच्या गट नंबर २८ मध्ये कोणत्याही प्रकारचा पंचनामा केलेला नव्हाता दिनांक १५/१२/२०१४ रोजी गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या जमिनीत येऊन तलाठी यांनी केलेला पंचनामा सत्यपरिस्थितीशी विसंगत आहे. व ही जमिन त्यांच्या ताब्यात असून तेथे झोपडी असून त्यांचे कुटुंब त्या झोपडीत राहत आहे. अर्जदार यांनी त्यांच्या गावातील श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांची फसवसुन करून खोटे शपथपत्र त्यांच्या बाजुने करून घेतलेले आहे हे सुनावणीच्या वेळी संजय गोठवाल यांनी कबुल केलेले आहे व सदर जमिन खरेदीविक्री अंतर्गत असल्याचे जवाबात लिहुन दिलेले आहे. त्याच्या बाजुने गावातील रहिवाशी नामे विजयसिंग चैनसिंग गोठवाल,

सुरजसिंग नंदराम महेर, गणेश लखीचंद गोठवाल, निमचंद हरचंद भोपळे, सुखलाल फकिरचंद गोठवाल व संग्राम देवसिंग चुंगडे यांचे मुळ शपतथपत्र त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घेतलेल असून त्या मध्ये त्यांनी गट नंबर २८ मधील जमिनीबाबत सत्यपरिस्थिती संबंधाने माहिती सांगितलेली आहे.झालेला व्यवहार हा निवळ खरेदीविक्रीचा आहे. यात कोणताही सावकारी व्यवहार नसुन हि जमिन त्यांच्या ताब्यात आहे व ते त्यावर पिक घेत आहे. गैरअर्जदार क्रमांक २ यांच्या जमिनीशी कोणाचाही संबंध नाही. व सावकारी प्रकरणात गुंतविण्यासाठी सदरिल प्रकरण दाखल केलेले आहे. व अशा खोटया नाटया केसेस यास कंटाळुन मा. दिवाणी न्यायालय सिल्लोड येथे अर्जदार यांनी त्यांच्या जमिनीत हस्तक्षेप करू नये म्हणुन दिवाणी दावा क्रमांक २३६/२०१५ दाखल केलेला आहे. त्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय यांनी अर्जदार यांना नोटीसा काढलेल्या आहे. व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी योग्यतो तपास करून गैरअर्जदार यांच्यावर अन्याय होऊ नये यासाठी हे खोटे सावकारी प्रकरण फेटाळावे अशी विनंती केली.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ४ अन्वये सहाय्यक निबंधक कार्यालयातील चौकशी अधिकारी श्री. डि.डि.जैस्वाल यांनी त्यांचा चौकशी अहवाल सादर केला असून त्या अहवालात असे नमुद आहे की, दिनांक २०.०८.२०१५ रोजी अर्जदार यांना सोबत घेवुन गैरअर्जदार १ याना महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत नोटीस देवुन दिनांक २०.०८.२०१५ रोजी गैरअर्जदार १ यांचे घराची घरझडती घेण्यात आलेली आहे. घर झडतीमध्ये श्री देवसिंग छोटीराम ,समाधान देवसिंग,सग्राम देवसिंग,राजु देवसिंग,कौशल्याबाई देवसिंग व गणेश देवसिंग यांचे व्यवहारबद्यलचा कागदपत्र  व श्री.बाळु आंबादास यांचे नावाचे दोन ७/१२ उतारा चौकशी कामी ताब्यात घेण्यात आलेले होते.

सदर घरझडती नंतर उक्त प्रकरणी सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली व चौकशी दरम्यान अर्जदार व गैरअर्जदार यांना चौकशी कामी बोलविण्यात आले.त्यानुसार अर्जदार  यांनी त्यांचा रु.१००/- च्या बॉण्ड वर नोटरी करुन दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपथपत्रावर जवाब सादर केलेला आहे.त्यात त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक ११.११.२०१४ रोजी व वेळोवेळी सहकार खात्याकडे खाजगी सावकार गैरअर्जदार १ व हस्तक  गैरअर्जदार २ यांच्या विरुध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असुन त्या तक्रारी खऱ्या आहेत .त्यांना त्यांची वहीण नामे सुनिताबाई हिच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांचे वडील व त्यांनी दोघांनी मिळुन चारनेरवाडी येथील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन रु.५०,०००/- दरमहा दरशेकडा रु.५ टक्के व्याजदराने सन २००५ मध्ये घेतलेले होते.या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली चारनेरवाडी शिवारातील गट २८ मधील ८१ आर शेत जमीन सदर सावकार यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावाने सावकाराच्या सांगण्यावरुन मुद्दल व व्याजाची परतफेड झाल्यावर जमीन वापस देण्याची तोंडी बोली  पंचसाक्षीदारा समक्ष ठेवुन कायम खरेदी खताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याने जमिन त्यांचे ताब्यात आहे व त्या शेत जमीनीवर चालु वर्षी कापुस पिक घेतलेले आहे.आतापर्यंत त्यांनी  सदर सावकारास मुद्दल व व्याज मिळुन सन २००५ ते

२०१५ या कालावधीत रु.१०८०००/- परत केलेले आहे.व या शेतजमिनिचे खरेदीखत सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या घरी ठेवलेले आहे. सावकार आणखी ९,०००००/- रुपयाची मागणी करीत आहे. ती रक्कम न दिल्यास जमीन परस्पर विक्री करण्याची धमकी व त्यांच्या गैरअर्जदार २ हस्तकाकडुन अट्रोसिटी दाखल करण्याची धमकी देत आहे. गैरअर्जदार १ व त्यांच्यामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे. व त्या बदल्यात जमिन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेत जमिन त्यांच्या गैरअर्जदार २ हस्तकाच्या नावावर लिहुन दिलेली आहे. या सावकारी व्यवहारत गावातील ०५ पंच श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, श्री कैलास कोंडुसिंग बिलवाल, श्री नारायण बजरंग गोठवाल, श्री देवसिंग फुलसिंग महेर, श्री विठ्ठलसिंग तुलसिराम गोठवाल व तंटामुक्ती अध्यक्ष श्री आबेद सरदार देशमुख हे साक्षिदार आहेत असा जवाब चौकशीच्या वेळी सादर केलेला आहे. तसेच अर्जदार यांनी वरील जवाबा प्रमाणेच संदर्भिय तक्रार दाखल केलेली आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS DIST

चौकशीच्या वेळी चौकशी अधिकारी यांचेकडे श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, कैलास कोंडुसिंग बिलवाल, नारायण बजरंग गोठवाल, जनार्धान चंद्रभान होळकर, देवसिंग फुलसिंग महेर, विठ्ठलसिंग तुळशिराम गोठवाल, यांनी त्यांचे रू.१०० च्या बॉंडवर त्यांचे जवाब नोंटरी समक्ष करून देऊन सादर केलेले आहे. त्या जवाबात त्यांनी असे लिहुन दिले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखतात श्री. अंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा अर्जदार दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्या कडुन सन २००५ मध्ये रू. ५००००/- दमादशे ५% या व्याज दराने रक्कम घेतली होती. या पैशास धर म्हणुन अर्जदारे यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन सावकाराच्या सांगण्यावरून सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन परत पलटवुन देण्याच्या तोडी बोलीवर खरेदीखता आधाराने लिहुन दिलेली होती. या खरेदीखतावर त्यांनी साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे. अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्यात जमिन खरेदीचा व्यवहार नसुन खाजगी सावकारीचा व्यवहार आहे. पैशास व्याज असल्याने शेतजमिन अर्जदार यांच्या ताब्यात असून त्या जमिनीवर ते पिक घेत आहे. सध्यास्थितीत त्या जमिनीमध्ये कापूस या पिकाची लागवड केलेली आहे. व काही जमिन पडीक आहे. अर्जदार याच्या सदर शेतजमिनीच्या शेजारीच त्याची शेतजमिन आहे. आतापर्यंत अर्जदार यांनी गैरअर्जदार १ सावकारास रू.१०८०००/- मुद्दल व व्याजासहीत त्यांच्या समक्ष परत केलेले आहे. असे असतांना सदर सावकार त्यांची शेतजमिन परत पलटवुन देण्याची बोली असल्यावरही परत पलटवुन देत नाही. व गैरअर्जदार १ सावकार आणखी रू. ९०००००/- ची मागणी करीत आहे. व जमिन परस्पर विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ यांच्या मार्फत त्याच्यावर खोटी अॅट्रॉसिटीची केस करण्याची धमकी देत आहे. असे जवाब चौकशी अधिकारी यांचे कडे सादर केलेला आहे.

अर्जदार यांनी तलाठी यांनी शेतजमीनींच्या ताब्याबाबत मा.तहसिलदार सिल्लोड यांना लिहलेल्या दिनांक २०.१२.२०१४ च्या पत्राची व दिनांक १५.१२.२०१४ च्या पंचनाम्याची प्रत सादर केली आहे.सदर दिनांक २०.१२.२०१४ च्या पत्राचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

मौजे चारनेर शिवारातील गट नं.२८ मधील ७/१२ उताऱ्याच्या मालकी हक्कात गैरअर्जदार २ यांच्या नावाने ८१ आर जमीनीची खरेदीने नोंद असुन तिचा फेरफार क्र.२१७ आहे.गैरअर्जदार २ यांनी ही जमीन खरेदी खत क्र.१६००/२००५,दिनांक २९.०३.२००५ने खरेदी केल्याचे आढळुन येत आहे.व त्याआधारे तलाठी यांनी फेर घेतलेला आहे.सन २००६-०७ ते २००९-१० पर्यंत गैरअर्जदार २ यांच्या नावाने नोंद दिसुन येत आहे. सन २०१०-११ ते २०१३-१४ या वर्षामध्ये वहिती रकान्याला जातखुद अशी नोंद आहे. तहसिलदार यांचे कार्यालयातुन आलेल्या अर्जानुसार चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मध्ये प्रत्यक्ष जावुन पंचनामा केला असता अर्जदार यांच्या ताब्यात ही शेत जमीन असुन त्यामध्ये सन २०१४-१५ वर्षाच्या खरीप हंगामात अर्जदार यांनी मक्का पिकाची लागवड केलेली आहे. व जमीन अर्जदार यांच्या ताब्यात असल्याचे पत्रात नमुद आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS (CO-OP) DIST. AURANGABAD

तलाठी यांनी दिनांक १५.१२.२०१४ रोजी केलेल्या पंचनाम्यात नमुद आहे की, गट नं.२८ मध्ये पंचासमक्ष गट नं.२८ मध्ये पाहणी केली असता अर्जदार यांनी सन २०१४-१५ या खरीप हंगामात मका पीक घेतलेले आहे .व पीक सोगुंन पुंज जमा केलेला आहे. संबंधीत क्षेत्र ट्रॅक्टरने कल्टीवेटर केलेले आहे.पंचाच्या सांगण्यानुसार गैरअर्जदार २ यांचे नाव जरी ७/१२ च्या मालकी हक्कात नोंद असली तरी संबंधीत ८१ आर जमीन मध्ये अर्जदार हे पीक घेतात व उपस्थित पंच लोक यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर हजर राहुन त्यांच्या सदसदविवेक बुध्दीने पंचनामा करुन दिला असल्याबाबत पंचनाम्यात नमुद आहे.या पंचनाम्यावर तलाठी व पंचलोक श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल,श्री अनिल बाबुराव अंभोरे,श्री सुखदेव लक्ष्मण काळे,श्री देवसिंग फुलसिंग महेर,श्री तुकाराम अश्रुबा होळकर,श्री अंचितराव देवराव मुठ्ठे,श्री असेफमिया युसुफमिया देशमुख व श्री नय्युम मोहम्मद पटेल यांच्या स्वाक्ष-या आहेत.

ज्यांच्या विरुध्द तकार प्राप्त झालेली आहे ते गैरअर्जदार १ यांनी त्यांचा दिनांक १५.०९.२०१५ रोजी जवाब चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला असुन,त्यात त्यांनी नमुद केले आहे की,ते चारनेरवाडी येथील रहिवासी असुन व्यवसायाने शेती करतात. अर्जदार यांनी त्यांच्याविरुध्द अवैध सावकारीबाबत ज्या तक्रारी केलेल्या आहे ती तक्रार त्यांना जवाबाच्या वेळी प्रत्यक्ष वाचुन दाखविण्यात आली .ती तक्रार खोटी असुन त्यांच्याशी असा कोणताही व्यवहार झालेला नाही शेत जमीनीचे खरेदी खत त्यांच्या नावाने नाही व त्यांनी अर्जदार व त्यांच्या वडीलांना कोणत्याही प्रकारे व्याजाने रक्कम दिलेली नाही,असा जवाब दिलेला आहे.

गैरअर्जदार २ यांनी त्यांचा जवाब दिनांक १५.०९.२०१५ रोजी सादर केलेला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी सन २००५ मध्ये अर्जदार यांच्या कडुन गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन रु.६६०००/- मध्ये खरेदी केलेली आहे. या शेतजमीनीचे खरेदी खत दुय्यम निबंधक,यांच्या समोर झालेले आहे.हि शेत जमिन त्यांनी

त्यांचे कामाचे पेशातुन खरेदी केलेली आहे. जमिन खरेदीच्या वेळी ते गैरअर्जदार १ यांच्याकडे सालाने होते व त्यांनी वार्षिक साल मजुरी रु.३००००/-होती, सदर साल मजुरी त्यांनी गैरअर्जदार १ यांनी टप्याटप्याने दिलेले आहे. ही रक्कम व काही रक्कम आई-वडील यांच्याकडुन घेवुन त्यामधुन हि जमीन खरेदी केलेली आहे. चौकशीच्या वेळी गट नं.२० मधील झालेले श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांच्या शेत जमीनेचे खरेदी खत क्र.९१५/२००४ व खरेदी खत क्र.१५९९/२००५ ची प्रत त्यांना दाखविण्यात आली असता या व्यवहारबाबत त्यांना काहीही माहिती नाही.या शेतजमिनीचा व्यवहार श्री संजय प्रताप गोठवाल व गैरअर्जदार १ यांच्यामध्ये झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी माझे नाव टाकलेले आहे. गैरअर्जदार १ यांनी सही करण्याचे सांगितलेले असल्याने त्यांनी या खरेदीखतावर सही केलेली आहे, असा जवाब दिलेला आहे.

श्री संजय प्रतापसिंग गोठवाल रा.चारनेरवाडी,यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ११.१२.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते चारनेरवाडी येथील राहीवासी असुन व्यवसायाने शेती करतात. त्यांनी गावातील सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन रु.३०,०००/- द.म.द.शे ३%व्याज दाराने घेतले होते व या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची गट नं.२० मधील ४१ आर शेतजमीन सावकार गैरअर्जदार १ यांच्या सांगण्यावरुन सावकाराचा हस्तक नामे गैरअर्जदार २ यांच्यानावाने खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली होती.सदरचा व्यवहार हा पुर्णपणे सावकारी व्यवहार असल्याने जमीन त्यांच्या ताब्यात होती.तद्नंतर या घेतलेल्या रक्कमेपोटी त्यांनी व्याजासह रु.६०,०००/- सावकार गैरअर्जदार १ यांना परत केलेले आहे. ही जमीन त्यांनी त्यांच्या पुतण्या श्री नारायण बजरंग गोठवाल यांना विक्री केल्याने त्यांचे सांगितल्याप्रमाणे सावकार गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांना सांगुन त्यांच्या पुतण्याच्या नावाने शेतजमिन परत पलटुन दिलेली आहे. त्यांनी हि शेत जमिन सावकारी व्यवहारत गैरअर्जदार १ यांनी सांगितल्यानुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने लिहुन दिलेली होती.

गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांनी त्यांचे अभियोक्ते श्री विजय मंडलेच्या यांचे मार्फत लेखी युक्तीवाद चौकशी अधिकारी यांना सादर केला त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

अर्जदार यांनी त्यांची जमिन हडप केल्याबद्दलचा दिलेला अर्ज हा व्देष भावनेतुन दिलेला असुन खोटा आहे.सदर जमिन त्यांनी खरेदी खतानुसार खरेदी केलेली आहे. जमिन ही आता चारनेर धरणाच्या क्षेत्रात असल्याने व जमिनीचे भाव प्रचंड वाढले असल्याने त्यांनी खोटा अर्ज दिलेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या विरुध्द वेगवेगळया खोटया केसस केलेल्या असुन त्या न्याय प्रविष्ट आहे.त्यांनी खरेदी केलेली शेत जमिनही त्यांच्याच ताब्यात आहे.जमिन खरेदी केल्यापासुन आजपर्यंत त्यांच्या विरुध्द असा कुठलाही अर्ज अर्जदार यांनी दिलेला नाही. अर्जदार यांनी सांगितल्याप्रमाणे ते सावकारी व्यवहार करीत नाही.गैरअर्जदार १ यांच्या कडे ते सालगडी म्हणुन काम करीत नाही. अर्जदार व गैरअर्जदार २ यांच्यात झालेला व्यवहार हा निव्वळ खरेदी विक्रीचा व्यवहार असुन अर्जदार यांनी व्देष बुदधीने व ते अनुसुचित जातीचे असल्याने त्यांना सदर जमिनीतुन बेदखल करण्याच्या उद्देशाने व त्रास देण्याच्या

उद्देशाने व ते गावात एकटे अनुसुचित जातीचे असल्याने त्यांना हकलण्यासाठी सदरचा खोटा अर्ज गावातील लोकांच्या खोटया सहया व शपथपत्र घेवुन दिलेला आहे.वस्तुस्थिती अशी आहे की, गैरअर्जदार २ व त्यांच्या कुटुंबीयांनी मोलमजुरी करुन यापुर्वी संजय गोठवाल यांची १ एकर जमिन ही नोंदणीकृत खरेदी खताव्दारे खरेदी केली होती. त्यानुसार त्यांचा फेर सुध्दा मंजुर झालेला आहे.त्यानंतर सदर अर्जदार यांना पैशाची आवश्यकता असल्याने त्यांनी त्यांची मौजे चारनेरवाडी येथील गट नं.२८ मधील जमिन विक्रीला काढली व ती जमिन चांगली सुपीक असल्याने गैरअर्जदार २ यांनी श्री संजय गोठवाल यांच्या कडुन खरेदी केलेली १ एकर जमीन विक्री करुन व त्यांच्याकडे आलेल्या रक्कमेतुन अर्जदार यांची गट नं.२८ मधील ८१ गुठ्ठे जमीन दिनांक २९.०३.२००५ रोजी नोंदणीकृत खरेदी क्र.१६००/२००५ नुसार खरेदी केलेली आहे. व त्यानुसार जमिनीचा फेर मंजुर झालेला आहे. ही [illegible] जमिन खरेदी केली तेव्हापासुन मिळकतीची वहिती मालक या नात्याने त्यांची आहे. अर्जदार यांनी सदर जमिन विक्री केल्यापासुन त्यांचा कुठलाही हक्क व संबंध नाही. तसेच गैरअर्जदार १ यांचाही सदर जमिनीची कुठलाही हक्क संबंध नाही. गैरअर्जदार २ यांच्याकडे गट न.२८ व्यतिरिक्त इतर जमिन नाही. गैरअर्जदार २ यांचे संपुर्ण कुटुंब हे जमिनी मेहनत करुन उत्पन्न काढतात व इतराच्या शेतात मोलमजुरी करुन स्वतःचा व कुटुंबीयाचा उदरनिर्वाह करतात. अर्जदार यांचा गावात जोडजमाव असल्यामुळे त्यांच्या मदतीने ते गैरअर्जदार२ यांना सदर जमिनीतुन बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहे. गैरअर्जदार २ यांना वेळोवेळी जातीवाचक शिवीगाळ व जाळपोळ केलेली असल्याने त्यांनी वेळोवेळी पोलीसाकडे तक्रारी दिलेल्या आहेत.तसेच अर्जदार व इतर यांच्या विरुध्द ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल केलेला आहे. या पलीकडे जावुन जाणुनबुजुन अर्जदार यांनी व त्यांचे नातेवाईक यांनी त्यांची बहीण अनिताबाई दिलीप कड हिच्या सोबतीने खोटा दिवानी दावा गैरअर्जदार २ व इतर यांच्या विरुध्द दाखल केलेला असुन सदर दाव्याचा क्र.आर सी.एस.१८५/२०१४ असुन सदरच्या दाव्यामध्ये अनिताबाई हिचा मनाई हुकुम मा.दिवानी न्यायाधिश क स्तर सिल्लोड यांनी फेटाळलेला आहे. अर्जदार यांनी दिलेला अर्ज हा बनावट व खोटा आहे. तक्रार अर्जामध्ये कर्जाला व्याजदर १०% नमुद असुन दाखल केलेल्या शपथ पत्रामध्ये ५% आहे.फेर क्रमांक चुकीचा आहे.गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांच्या मध्ये कुठल्याही प्रकारे संबंध नसुन सदर जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार हा अर्जदार व गैरअर्जदार २ यांच्यात झालेला आहे. ही जमिन हडप करण्यासाठी व त्रास देण्यासाठी खोटा तक्रार अर्ज दिलेला आहे. गैरअर्जदार २ हा गरीब व्यक्ती असुन त्यांच्याकडे इतर कोणतीही जमीन नाही.त्यांच्या कुटुंबीयांचे उदरनिर्वाहाचे साधन हे या जमिनीवर निघणाऱ्या उत्पन्नावर अवलंबुन आहे. त्यांचे विरुध्द यापुर्वी अशा स्वरुपाची कुठलीही तक्रार दाखल झालेली नाही अर्जदार व गैरअर्जदार २ यांच्यात झालेला व्यवहार हा निव्वळ खरेदी विक्रीचा व्यवहार आहे. व जमिनीची किंमत गैरअर्जदार २ यांनी त्यांच वेळी दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्दची तक्रार ही खोटी असुन त्यांनी सावकारी व्यवहार केलेला नाही व ते सावकारी करीत नाही. त्यामुळे तक्रार निकाली काढावी अशी विनंती चौकशी अधिकारी यांना केली आहे.

चौकशी अहवालात अर्जदार व गैरअर्जदार १ व २ यांचे म्हणने साक्षीदार यांचे जवाबानुसार चौकशी अंती या बाबत निदर्शनास आलेले मुद्दे अहवालात नमुद केलेले आहे व त्यावर चौकशी अंती त्यांचे अभिप्राय त्यांनी मुद्दे निहाय चौकशी अहवाल सादर केलेले आहे. ते मुद्दे पुढील प्रमाणे मुद्दा.१. अर्जदार यांनी केलेली तकार हि अवैध सावकारीत आहे काय? असल्यास त्याबाबतचे स्पष्टीकरण काय? मुद्दा.२. मुद्दा क्रमांक १ चे उत्तर व स्पष्टीकरण सकारात्मक असल्यास या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलमा नुसार कोणती कार्यवाही होणे आवश्यक आहे. चौकशी अधिकारी या नात्यांनी या मुद्या बाबत त्यांचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे अहवालात नमुद केलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी अहवालात असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी तक्रारीत नमुद केलेल्या मुद्यास अनुसरून या प्रकरणी पुढील साक्षीदारांनी त्यांच्याकडे दिलेल्या जवाबा द्वारे पुष्ठी दिलेली आहे. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे.

साक्षीदार श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल रा. चारनेरवाडी यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर शपथेवर जवाब सादर केलेला असून त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखतात श्री. अंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा अर्जदार दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्या कडुन सन २००५ मध्ये रू. ५००००/- दमादशे ५% या व्याज दराने रक्कम घेतली होती. या पैशास धर म्हणुन अर्जदारे यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन सावकाराच्या सांगण्यावरून सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखता आधाराने लिहुन दिलेली होती. या खरेदीखतावर त्यांनी साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे. अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्यात जमिन खरेदीचा व्यवहार नसुन खाजगी सावकारीचा व्यवहार आहे. पैशास व्याज असल्याने शेतजमिन अर्जदार यांच्या ताब्यात असून त्या जमिनीवर ते पिक घेत आहे. सध्यास्थितीत त्या जमिनीमध्ये कापूस या पिकाची लागवड केलेली आहे. व काही जमिन पडीक आहे. अर्जदार याच्या सदर शेतजमिनीच्या शेजारीच त्याची शेतजमिन आहे. आतापर्यंत अर्जदार यांनी सदर सावकारास रू.१०८०००/- मुद्दल व व्याजासहीत त्यांच्या समक्ष परत केलेले आहे. असे असतांना गैरअर्जदार १ सावकार त्यांची शेतजमिन परत पलटवुन देण्याची बोली असल्यावरही परत पलटवुन देत नाही. व गैरअर्जदार १ सावकार आणखी रू. ९०००००/- ची मागणी करीत आहे. व जमिन परस्पर विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ यांच्या मार्फत त्याच्यावर खोटी अॅट्रॉसिटीची केस करण्याची धमकी देत आहे. असा जवाब सादर केलेला आहे.

या व्यवहारतील दुसरे साक्षीदार श्री.कैलास कोंडुसिंग बिलवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन गैरअर्जदार १सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे. पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ मार्फत खोटी अ‍ॅट्रॉसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील तिसरे साक्षीदार श्री नारायण बजरंग गोठवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन गैरअर्जदार १ सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच पुर्वेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तका गैरअर्जदार २मार्फत खोटी अ‍ॅट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील चौथे साक्षीदार श्री जनार्धन चंद्रभान होळकर यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या

नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच दक्षिणेस त्यांची जमीन आहे. अर्जदारे यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत. रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ मार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील पाचवे साक्षीदार श्री देवसिंग फुलसिंग महेर यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपथेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच उत्तरेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तकगैरअर्जदार २ मार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील सहावे साक्षीदार श्री विठ्ठलसिंग तुळशीराम गोठवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५०,०००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन

देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच उत्तरेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१,०८,०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९,००,०००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ मार्फत खोटी ॲट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

तलाठी यांनी मा. तहसिलदार यांनी जमिनीच्या स्थळ पाहणी बाबत अहवाल सादर केलेला असून त्या अहवालानुसार सदर चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन हि रेकॉर्डला ७/१२ नुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने असून प्रत्यक्ष जमिनीचा ताबा अर्जदार यांचा असून सन २०१४-२०१५ या वर्षात त्यांनी मका या पिकाची लागवड केलेली आहे. ज्या वेळी तलाठी यांनी जमिनीच्या ताब्या बाबत पंचनामा केलेला आहे. त्या पंचनाम्यावर तलाठी व पंचलोक श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल,श्री अनिल बाबुराव अंभोरे,श्री सुखदेव लक्ष्मण काळे,श्री देवसिंग फुलसिंग महेर,श्री तुकाराम अश्रुबा होळकर,श्री अंचितराव देवराव मुठ्ठे,श्री असेफमिया युसुफमिया देशमुख व श्री नय्युम मोहम्मद पटेल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तसेच संजय प्रतापसिंग गोठवाल यांनी पुढील प्रमाणे जवाब चौकशी अधिकरी यांचेकडे सादर केलेला आहे.

श्री संजय प्रतापसिंग गोठवाल रा.चारनेरवाडी,यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ११.१२.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते चारनेरवाडी येथील राहीवासी असुन व्यवसायाने शेती करतात. त्यांनी गावातील सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन रु.३०,०००/- द.म.द.शे ३%व्याज दाराने घेतले होते व या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची गट नं.२० मधील ४१ आर शेतजमीन सावकार गैरअर्जदार १ यांच्या सांगण्यावरुन सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्यानावाने खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली होती.सदरचा व्यवहार हा पुर्णपणे सावकारी व्यवहार असल्याने जमीन त्यांच्या ताब्यात होती.तद्नंतर या घेतलेल्या रक्कमेपोटी त्यांनी व्याजासह रु.६०,०००/- सावकार गैरअर्जदार १ यांना परत केलेले आहे. ही जमीन त्यांनी त्यांच्या पुतण्या श्री नारायण बजरंग गोठवाल यांना विक्री केल्याने त्यांचे सांगितल्याप्रमाणे सावकार गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांना सांगुन त्यांच्या पुतण्याच्या नावाने पलटुन दिलेली आहे. त्यांनी हि शेत जमिन सावकारी व्यवहारत गैरअर्जदार १ यांनी सांगितल्यानुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने लिहुन दिलेली होती.

यानुसार चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात गैरअर्जदार १ यांचा अवैध सावकारी व्यवहार असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येते असे नमुद केले आहे. तसेच चौकशी अंती तक्रारदार अर्जदार यांनी त्यांच्या कडुन रू.५००००/- व्याजाने घेतले असल्या बाबत व या पैशास धर म्हणुन गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन परत

पलटवुन देण्याच्या तोंडी बोली ठेवुन खरेदीखता द्वारे गैरअर्जदार १ यांचे सांगण्यावरून गैरअर्जदार २ यांना यांना लिहुन दिली असल्या बाबत साक्षीदाराने जवाबा द्वारे कथन केलेले आहे. साक्षीदारांच्या म्हणन्यानुसार व तलाठी यांनी पंचासमक्ष केलेल्या जमिनीचे ताब्या बाबतच्या स्थळ पहाणी पंचनाम्यानुसार सदर शेतजमिन ही तक्रारदार अर्जदार यांच्या ताब्यात असल्याने अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्यात झालेला व्यवहार हा सावकारी व्यवहार असून शेतजमिनी खरेदी विक्रीचा नाही. ही शेतजमिन सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन गैरअर्जदार १ यांच्या सांगण्यानुसार गैरअर्जदार २ यांना लिहुन दिलेली दिसुन येत आहे व या अवैध खाजगी सावकारी व्यवहारात गैरअर्जदार १ यांना गैरअर्जदार २ हे मदत करीत असल्याचे साक्षीदारांच्या जवाबानुसार चौकशी अंती सकृत दर्शनी दिसुन येत असल्या बाबत चौकशी अधिकारी यांनी त्यांच्या चौकशी अहवाल नमुद केले आहे.

त्यामुळे उपरोक्त बाबी पाहता चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात उपलब्ध साक्ष, पुरावे व तलाठी यांच्या शेतजमिनीचे ताब्या बाबतचा पंचनामा पाहता सदर तक्रार ही अवैध सावकारी अंतर्गत असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत आहे, असे नमुद करून या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी ( नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) नुसार कार्यवाही होणे उचीत वाटते असे चौकशी अहवालात नमुद करून या तक्रारीस अनुसरून चौकशी अधिकरी यांनी त्यांनी त्यांचे चौकशी अहवालात खालील प्रमाणे चौकशी निष्कर्ष दिलेला आहे. अर्जदार यांनी त्यांची चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन हि अवैध खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडे बहिणीच्या लग्नासाठी ५% व्याजदराने रू. ५००००/- या रकमेसाठी अवैध सावकारीच्या ओघात गैरअर्जदार १ यांच्या सांगीतल्या वरून गैरअर्जदार २ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली आहे व ती शेतजमिन अर्जदार यांच्या ताब्यात खरेदीखताच्या दिनांक पासुन ते आजपर्यंत त्यांच्या ताब्यात आहे. व या अवैध सावकारी व्यवहारात गैरअर्जदार १ व २ यांचे संगनमत आहे. असा अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेले अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणने व लेखीपुरावे. गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांचा लेखी युक्तीवाद, चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल उपलब्ध साक्षीदार यांचे जवाब यावरून निदर्शनास आलेले मुद्दे व त्यावर कारणासह निष्कर्ष खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी केलेली तक्रार ही अवैध सावकारी प्रकरणात मोडते काय? | होकारार्थी |
| २. | चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल वस्तुस्थिती दर्शक आहे काय? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार यांनी त्यांची चारनेरवाडी येथील सर्वे नंबर २८ मधील ८१ आर एवढी जमिन सावकार गैरअर्जदार १ यांच्या सांगितल्या वरून त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांचे नावावर सावकारी व्यवहारात रू.५००००/- मध्ये प्रतिभुती म्हणुन दिली आहे काय? दिली असल्यास सदरची शेतजमिन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळहस्तांतरण कार यांना परत करणे योग्य आहे काय? | होकारार्थी |

# कारणमिमांसा

अर्जदार श्री. बाळु अंबादास मुठ्ठे रा. चारनेरवाडी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांनी दिनांक ११/११/२०१४ रोजी गैरअर्जदार सावकार श्री. भिका छोटीराम चुंगडे यांच्या विरूध्द अवैध सावकारी संबंधाने दिलेल्या तक्रारीस अनुसरून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड व त्यांचे कार्यालयातील सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचे चौकशी अहवालानुसार व या कार्यालयात सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेल्या पुराव्या व युक्तीवादानुसार सदरची तक्रार ही अवैध सावकारीत मोडत असल्या बाबत दिसुन येते.

चौकशी अधिकारी यांचे अहवालाची साकल्याने पहाणी केली असता सदर चौकशी अहवाल हा वस्तुस्थिती दर्शक असल्याचे सुनावणी अंती व युक्तीवादानुसार निदर्शनास आलेले आहे. म्हणुन मुद्द क्रमांक १ व २ चे निष्कर्ष सुनावणी अंती होकारार्थी दिलेले आहे.या बाबतची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DCI AURANGABAD

चौकशी अधिकारी यांचेकडे या शेतजमिनीच्या खरेदीखतावरील साक्षीदार व जमिनीच्या शेजारील साक्षीदार यांनी त्यांचे रू. १०० च्या बाँड वर जवाब सादर केलेले आहे. त्यानुसार सदरची शेतजमिन अर्जदार यांचे ताब्यात असून या व्यवहारात खाजगी सावकारी व्यवहार असून या सावकारी रकमे पोटी सदरची शेतजमिन प्रतिभुती म्हणुन गैरअर्जदार १ यांचे सुचनेनुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने लिहुन दिले असल्या बाबत जवाबा नमुद आहे. तसेच तलाठी यांचे स्थळ पहाणी पंचनाम्या नुसार ही शेतजमिन अर्जदार यांचे ताब्यात असल्याचे दिसुन येते त्या जवाबाचा व तलाठी यांचे पंचनाम्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

साक्षीदार श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल रा. चारनेरवाडी यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर शपथेवर जवाब सादर केलेला असून त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखतात श्री. अंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा अर्जदार दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्या कडुन सन २००५ मध्ये रू. ५००००/- दमादशे ५% या व्याज दराने रक्कम घेतली होती. या पैशास धर म्हणुन अर्जदारे यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन सावकाराच्या सांगण्यावरून सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखता आधाराने लिहुन दिलेली होती. या खरेदीखतावर त्यांनी साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे. अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्यात जमिन खरेदीचा व्यवहार नसुन खाजगी सावकारीचा व्यवहार आहे. पैशास व्याज असल्याने शेतजमिन अर्जदार यांच्या ताब्यात असून त्या जमिनीवर ते पिक घेत आहे. सध्यास्थितीत त्या जमिनीमध्ये कापूस या पिकाची लागवड केलेली आहे. व काही जमिन पडीक आहे. अर्जदार याच्या सदर शेतजमिनीच्या शेजारीच त्याची शेतजमिन आहे. आतापर्यंत अर्जदार यांनी सदर सावकारास रू.१०८०००/- मुद्दल व व्याजासहीत त्यांच्या समक्ष परत केलेले आहे. असे असतांना गैरअर्जदार १ सावकार त्यांची शेतजमिन परत पलटवुन देण्याची बोली असल्यावरही

परत पलटवुन देत नाही. व गैरअर्जदार १ सावकार आणखी रू. ९०००००/- ची मागणी करीत आहे. व जमिन परस्पर विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ यांच्या मार्फत त्याच्यावर खोटी ॲट्रॉसिटीची केस करण्याची धमकी देत आहे. असा जवाब सादर केलेला आहे.

या व्यवहारतील दुसरे साक्षीदार केलास कोंडुसिंग बिलवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन गैरअर्जदार १सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे. पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ मार्फत खोटी ॲट्रॉसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
DIST. AURANGABAD

या व्यवहारतील तिसरे साक्षीदार श्री नारायण बजरंग गोठवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन गैरअर्जदार १ सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच पुर्वेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले

आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तका गैरअर्जदार २मार्फत खोटी अॅट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील चौथे साक्षीदार श्री जनार्धन चंद्रभान होळकर यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच दक्षिणेस त्यांची जमीन आहे. अर्जदारे यांनी आतापर्यत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत. रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ मार्फत खोटी अॅट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील पाचवे साक्षीदार श्री देवसिंग फुलसिंग महेर यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपथेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठ्ठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५००००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच उत्तरेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१०८०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९०००००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तकगैरअर्जदार २ मार्फत खोटी अॅट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

या व्यवहारतील सहावे साक्षीदार श्री विठ्ठलसिंग तुळशीराम गोठवाल यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते गावातील अर्जदार व गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांना ओळखत असुन ,श्री आंबादास बाबुराव मुठे यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी व त्यांचा मुलगा दोघांनी मिळुन गावातील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन सन २००५ मध्ये रु.५०,०००/- दरमहा दर शेकडा ५% व्याजदाराने घेतले होते.व या पैशास धर म्हणुन अर्जदार यांच्या नावावरील चारनेरवाडी शिवारातील गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन सावकाराच्या सांगण्यावरुन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावावर मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमीन परत पलटुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदी खताव्दारे लिहुन दिली होती. व दोघामध्ये जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारीचा व्यवहार झालेला आहे.पैशास व्याज असल्याने शेत जमीन अर्जदार यांच्या ताब्यात आहे.व सद्यस्थितीत त्या शेतजमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केलेली आहे.या शेतजमिनी शेजारीच उत्तरेस त्यांची जमीन आहे. अर्जदार यांनी आतापर्यंत गैरअर्जदार १ सावकारास श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल यांचे साक्षीने रु.१,०८,०००/- परत केलेले आहे. गैरअर्जदार १ सावकार आणखी रु.९,००,०००/-ची मागणी करित आहेत.रक्कम न दिल्यास जमीन विकण्याची व हस्तक गैरअर्जदार २ मार्फत खोटी अॅट्रोसीटीची केस करण्याची धमकी देत आहे, असा जवाब दिलेला आहे.

तलाठी यांनी मा. तहसिलदार यांना जमिनीच्या स्थळ पाहणी बाबत अहवाल सादर केलेला असून त्या अहवालानुसार सदर चारनेरवाडी शिवारातील गट नंबर २८ मधील ८१ आर शेतजमिन हि रेकॉर्डला ७/१२ नुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने असून प्रत्यक्ष जमिनीचा ताबा अर्जदार यांचा असून सन २०१४-२०१५ या वर्षात त्यांनी यात मका या पिकाची लागवड केलेली आहे. ज्या वेळी तलाठी यांनी जमिनीच्या ताब्या बाबत पंचनामा केलेला आहे. त्या पंचनाम्यावर तलाठी व पंचलोक श्री उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल,श्री अनिल बाबुराव अंभोरे,श्री सुखदेव लक्ष्मण काळे,श्री देवसिंग फुलसिंग महेर,श्री तुकाराम अश्रुबा होळकर,श्री अंचितराव देवराव मुठे,श्री असेफमिया युसुफमिया देशमुख व श्री नय्युम मोहम्मद पटेल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तसेच संजय प्रतापसिंग गोठवाल यांनी पुढील प्रमाणे जवाब चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

श्री संजय प्रतापसिंग गोठवाल रा.चारनेरवाडी,यांनी त्यांचा रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर दिनांक ११.१२.२०१५ रोजी शपतेवर जवाब सादर केलेला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते चारनेरवाडी येथील राहीवासी असुन व्यवसायाने शेती करतात. त्यांनी गावातील सावकार गैरअर्जदार १ यांच्याकडुन रु.३०,०००/- द.म.द.शे ३%व्याज दाराने घेतले होते व या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची गट नं.२० मधील ४१ आर शेतजमीन सावकार गैरअर्जदार १ यांच्या सांगण्यावरुन सावकाराचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्यानावाने खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली होती.सदरचा व्यवहार हा पुर्णपणे सावकारी व्यवहार असल्याने जमीन त्यांच्या ताब्यात होती.तदूनंतर या घेतलेल्या रक्कमेपोटी

त्यांनी व्याजासह रु.६०,०००/- सावकार गेरअर्जदार १ यांना परत केलेले आहे. ही जमीन त्यांनी त्यांच्या पुतण्या श्री नारायण बजरंग गोठवाल यांना विक्री केल्याने त्यांचे सांगितल्याप्रमाणे सावकार गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांना सांगुन त्यांच्या पुतण्याच्या नावाने पलटुन दिलेली आहे. त्यांनी हि शेत जमिन सावकारी व्यवहारत गैरअर्जदार १ यांनी सांगितल्यानुसार गैरअर्जदार २ यांच्या नावाने लिहुन दिलेली होती. या जवाबा वरूनही गैरअर्जदार १ यांचा अवैध सावकारी व्यवहार असल्याचे दिसुन येत आहे.

गैरअर्जदार १ व २ यांनी सुनावणीच्या वेळी त्यांचा लेखी म्हणने व युक्तीवाद सादर केलेला आहे. गैरअर्जदार १ व २ यांनी सुनावणीच्या वेळी ज्या साक्षीदाराचे शपथपत्र सादर केलेले आहे. त्यामध्ये श्री.विजयसिंग चैनसिंग गोठवाल वय ४५ रा. चारनेरवाडी, श्री.सुरजसिंग नंदाराम महेर वय ४७ रा. चारनेरवाडी, श्री.गणेश लखीचंद गोठवाल वय २८ रा. चारनेरवाडी, श्री.निमचंद हरचंद भोपळे वय ६० रा. चारनेरवाडी, श्री.सुखलाल फकिरचंद गोठवाल वय ४० रा. चारनेरवाडी व श्री.संग्राम देवसिंग चुंगडे वय ३५ रा. चारनेरवाडी या साक्षीदारांनी सदरची शेतजमिन अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना विक्री केल्याचे नमुद करून सदर शेतजमिनीचा ताबा गैरअर्जदार २ यांचा आहे यात सावकारी व्यवहार नाही असे जवाब रू. १०० बाँड वर नोटरी समक्ष करून सादर केलेले आहे. या गैरअर्जदार १ व २ यांच्या म्हणन्यास व साक्षीदारांच्या शपथपत्रास पुष्टी देता येत नाही. कारण सदर चे साक्षीदार हे सदर व्यवहारातले साक्षीदार नाही. तसेच जमिनीच्या आजु बाजुचे शेजारीही नाहीत. अर्जदार यांनी चि.सौ.का. कविता श्री.तारांचद विठ्ठलसिंग ताटु (राजपुत) रा.चारनेरवाडी ता.सिल्लोड यांची कन्या व चि.जगदिश श्री.मदनसिंग झिपरु चरावंडे यांचे रा.धावडा ता.सिल्लोड यांचे सुपुत्र यांच्या लग्नाची दिनांक १५/०४/२०१३ ची लग्नपत्रीका सादर केलेली आहे, त्यावरून या साक्षीदारां पैकी श्री. संग्राम देवसिंग चुंगडे हे गैरअर्जदार १ यांचे भाऊ श्री. देवसिंग छोटीराम चुंगडे यांचे पुत्र म्हणजेच गैरअर्जदार १ यांचे पुतने आहेत हे स्पष्ट होते. या मधील दुसरे साक्षीदार श्री. गणेश लखीचंद गोठवाल यांचे वय २८ असल्याचे नमुद आहे. अर्जदार यांनी केलेला व्यवहार हा सन २००५ चा आहे. त्यावेही श्री. गणेश लखीचंद गोठवाल यांचे वय १७ असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे ते त्यावळी अज्ञान होते. याचाच अर्ज श्री. गणेश लखीचंद गोठवाल यांनी खोटा जवाब नोटरीवर सादर केलेला आहे.अर्जदार यांनी खरेदीखत क्रमांक १६००/२००५ दिनांक २९/०३/२००५ रोजी करून दिलेल्या खरेदीखताची पहाणी केली असता या मधील साक्षीदार हे श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल व श्री.कैलास कोंडुसिंग बिलवाल हे आहेत. व त्यांनी रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर नोटरी समक्ष लिहुन दिले आहे की, सदरचे खरेदीखत व्यवहार हा खाजगी सावकारीचा आहे. त्या जवाबाचा तपशिल वर नमुद केलेला आहे. तसेच या शेतजमिनीच्या शेजारील श्री. उदयसिंग विठ्ठलसिंग गोठवाल, श्री.नारायण बजरंग गोठवाल, श्री.जनार्धन चंद्रभान होळकर, श्री.देवसिंग फुलसिंग महेर, श्री.विठ्ठलसिंग तुळशिराम गोठवाल, यांची जमिन असुन त्यांनी सदरची जमिनी अर्जदार यांच्या ताब्यात असून या जमिनीवर त्यांनी यावर्षी

कापूस या पिकाची लागवड केल्याचे वरील जवाबात नमुद केलेले आहे. त्यामुळे गैरअर्जदार १ व २ यांनी सादर केलेल्या लेखी म्हणन्यास, युक्तीवादास व त्यांनी सादर केलेल्या साक्षीदारांच्या शपथपत्रास पुष्टी देता येत नाही.

श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांनी सुनावणीच्या वेळी दिनांक ०६/०२/२०१६ चे नोटरी समक्ष करून दिलेले शपथपत्र सादर केले असून त्यात असे नमुद केले आहे की, अर्जदार श्री. बाळु यांचे भाऊ श्री. रघुनाथ अंबादास मुठ्ठे यांनी कोऱ्याबॉंडवर सही घेऊन त्यांचा दुरूपयोग करून खोटे शपथपत्र फसवणुक करून तयार करून घेतले आहे. वास्तविक त्यांनी दिनांक २६/०४/२००४ रोजी सुपडु वाळुबा साळवे यांना त्यांचे मालकीची ४२ आर जमिन कायम खरेदीखताने विक्री केली त्यांनी ति जमिन दिनांक २९/०३/२००५ रोजी त्यांचे भावाचा मुलगा श्री. नारायण बजरंग गोठवाल रू. ४४०००/- विक्री केली. त्या जमिनीचा ताबा त्यांच्या भावाच्या मुलाकडे आहे. या व्यवहारात सावकारी व्यवहार झालेला नाही. या व्यतिरिक्त त्यांनी सुदाम अंबरसिंग गोठवाल यांना २ एकर जमिन रू. ११००००/- विक्री केली आहे. प्रस्तुत वादातील अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात सावकारी झालेली नाही. सदरचा व्यवहार खरेदी विक्रीचा आहे. सदरचे खरेदीखत त्यांचे समोर झालेले आहे. व पैसे त्यांच्या समोर दिलेले आहे. त्यांच्या भावाने रू.४४०००/- दिले व गैरअर्जदार २ यांनी काही पैसे टाकुन रू.६६०००/- दिले सदरच्या शेतजमिनीचा ताबा गैरअर्जदार २ यांचा असून त्यामध्ये कुडाचे घर आहे. सदर शेतावर जि.म.स.बँकेचे रू. १२०००/- कर्ज घेतलेले आहे. ते या दोन्ही व्यवहारामध्ये खरेदीखतावर साक्षीदार नाहीत. परंतु खरेदीखत झाले त्या वेळी ते हजर होते. व्यवहार गावात झाला असून पैसे सिल्लोड येथे देण्यात आलेले आहे या म्हणन्यास पुष्टी देता येत नाही कारण गैरअर्जदार २ यांनी त्यांचा जो पुर्वीचा जवाब दिनांक १५.०९.२०१५ रोजी चौकशी अधिकारी यांचे कडे सादर केलेला असुन त्या जवाबात गैरअर्जदार २ यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी सन २००५ मध्ये अर्जदार यांच्या कडुन गट नं.२८ मधील ८१ आर शेत जमीन रु.६६०००/- मध्ये खरेदी केलेली आहे. या शेतजमीनीचे खरेदी खत दुय्यम निबंधक,यांच्या समोर झालेले आहे.ही शेतजमिन त्यांनी त्यांचे कामाचे पैशातुन खरेदी केलेली आहे. जमिन खरेदीच्या वेळी ते गैरअर्जदार १ यांच्याकडे सालाने होते व त्यांनी वार्षिक साल मजुरी रु.३००००/-होती,सदर साल मजुरी त्यांनी गैरअर्जदार १ यांनी टप्याटप्याने दिलेले आहे. ही रक्कम व काही रक्कम आई-वडील यांच्याकडुन घेवुन त्यामधुन ही जमीन खरेदी केलेली आहे. चौकशीच्या वेळी गट नं.२० मधील झालेले श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांच्या शेत जमीनेचे खरेदी खत क्र.९१५/२०१४ व खरेदी खत क्र.१५९९/२०१५ ची प्रत चौकशी अधिकारी यांनी गैरअर्जदार २ यांना दाखविली असता या व्यवहारबाबत त्यांना काहीही माहिती नाही. या शेतजमिनीचा व्यवहार श्री संजय प्रताप गोठवाल व गैरअर्जदार १ यांच्यामध्ये झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांचे नाव टाकलेले आहे. गैरअर्जदार १ यांनी सही करण्याचे सांगितलेले असल्याने त्यांनी या खरेदीखतावर सही केलेली आहे,असा जवाब दिलेला आहे.त्यामुळे श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांनी गैरअर्जदार १ व २ यांच्या बाजुने नोटरी समक्ष करून दिलेले व सुनावणीच्या वेळी सादर केलेले दिनांक ०६/०२/२०१६ रोजीचे शपथपत्र पुर्णतहा खोटे आहे. कारण गैरअर्जदार २ कडुन त्यांची

जमिन खरेदी करणारे श्री. नारायण बजरंग गोठवाल (त्यांचा पुतण्या) यांनी स्वता: अर्जदाराच्या बाजुने रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर नोटरी समक्ष दिनांक ०८/०९/२०१५ रोजी शपथेवर जवाब सादर केलेला आहे. त्यानुसार त्यांचा शपथेवरील जवाब हा श्री. संजय प्रतापसिंग गोठवाल यांचे सुनावणी दरम्यान सादर केलेल्या गैरअर्जदार २ यांनी सदरची जमिनी खरेदी केली या म्हणन्यास पुष्टी देत नाही.

तसेच गैरअर्जदार १ यांच्या राहत्या घराच्या घरझडती मध्ये प्रस्तुत अर्जातील गट नंबर २८ या शेतजमिनीचा ७/१२ जो की, गैरअर्जदार क्रमांक २ यांचे नावाचा गैरअर्जदार क्रमांक १ यांचे घरी सापडलेला असून तो ७/१२ चौकशी अधिकारी यांनी चौकशी कामी ताब्यात घेतलेला आहे. त्यामुळे सदरची शेतजमिन हि गैरअर्जदार १ यांनीच गैरअर्जदार २ यांचे नावावर सावकारी व्यवसायात प्रतिभुती म्हणुन घेतल्याचे सिध्द होत आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST AURANGABAD

उपरोक्त बाबी पहाता चौकशी अंती व सुनावणी अंती अर्जदार श्री. बाळु अंबादास मुठ्ठे यांनी त्यांची चारनेरवाडी येथील गट नंबर २८ मधील ८१ आर एवढी जमिन गैरअर्जदार १ भिका छोटीराम चुंगडे यांना सावकारी व्यवहारात रू.५००००/- मध्ये प्रतिभुती म्हणुन दिली आहे व सदरची शेतजमिन गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ श्री. सुपडु वाळुबा साळवे यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन लिहुन घेतलेली आहे. ती शेतजमिन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळहस्तांतरण कार यांना परत करणे योग्य आहे म्हणुन मुद्द क्रमांक १, २ व ३ चे निष्कर्ष होकारार्थी दिलेले आहे.

तसेच खरेदीखत हे २००५ चे असतांना तलाठी पंचानाम दिनांक १५/१२/२०१४ नुसार सदरची जमिन हि अर्जदाराचे वहितीमध्ये/कब्जामध्ये आहेत आणि श्री. संजय प्रातप गोठवाल यांचे पहिले शपथपत्र दिनांक ११/१२/२०१५ रोजी व दुसरे शपथपत्र दिनांक ०६/०२/२०१६ पाहता प्रथम दिलेले शपथपत्र ग्राहय धरणे कायदयाने अभिप्रेत आहे. पुर्वीचे सदर शपथपत्र फसवणुक करून घेतले म्हणने बाबत त्यांनी त्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही केलेली नाही.

म्हणुन अर्जदार यांनी खरेदीखत क्रमांक १६००/२००५ दिनांक २९/०३/२००५ नुसार त्यांची मौजे चारनेरवाडी येथील सर्वे नंबर २८ मधील ८१ आर एवढी जमिन गैरअर्जदार १ भिका छोटीराम चुंगडे यांना सावकारी व्यवहारात रू.५००००/- मध्ये प्रतिभुती म्हणुन दिली आहे व सदरची शेतजमिन गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ श्री. सुपडु वाळुबा साळवे यांच्या नावाने लिहुन घेतली असल्याची माझी खात्री झालेली आहे व या जमिनीचे सदरचे खरेदीखत अवैध असल्याचे जाहिर करून रद्द करणे व अर्जदार मुळमालक हस्तांतरण करणारे श्री बाळु आंबादास मुठ्ठे यांना परत करणे करीता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी.एन.व्ही.आघाव, सावकाराचे जिल्हा निबंधक, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून

अर्जदार दुसरे सावकार गैरअर्जदार १ श्री. भिका छोटीराम चुंगडे यांच्या सांगित्या वरून त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ श्री. सुपडु वाळुबा साळवे यांना सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन खरेदीखता द्वारे लिहुन दिलेल्या मौजे चारनेरवाडी येथील सर्वे नंबर २८ मधील ८१ आर खरेदीखत क्रमांक १६००/२००५ दिनांक २९.०३.२००५ रोजी करून दिलेले शेतजमिनीचे खरेदीखत हे अवैध असल्याचे घोषीत करून रद्द करण्यात येत आहे. आणि सदर शेतजमिन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये अभिहस्तांतरण करणारे मुळ मालक श्री. बाळु आंबादास मुट्ठे रा. चारनेरवाडी ता. सिल्लोड यांना परत करण्यात येत आहे.

सदर आदेश आज दिनांक ०४/०३/२०१६ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही.आघाव)
सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

प्रत :- 1 ते 4

१. मा. उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२. मा. तहसिलदार,सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
३. तलाठी सजा,चारनेरवाडी ता. सिल्लोड यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. सिल्लोड यांना त्यांचा चौकशी अहवाल दिनांक ३१/१२/२०१५ चे संदर्भात

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद